महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं / प.उ.मा / 200
नागपूर,दि. 19 / 1 / 2024

प्रति,

मा.संचालक ,
माहीती प्रसिध्दी व,
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर, विभाग नागपूर.

विषयः—फेब्रूवारी / मार्च—2024 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत.

संदर्भः—1)राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा—7 / 260 दिनांक — 19 / 01 / 2024.
2) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा—7 / 261 दिनांक — 19 / 01 / 2024.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु / मार्च 2024 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.12वी) परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) ऑनलाईन ( **Online**) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर **College Login** मध्ये **Download** करण्याकरिता सोमवार, दिनांक 22.01.2024 पासून उपलब्ध करून देण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

तरी सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांना बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

सोबतः— राज्य मंडळ प्रकटनाची प्रत.

Kplande
( श्रीम. कल्पना लांडे )
विभागीय सचिवांकरिता ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः—
1) मा.सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी(माध्य).जिल्हापरिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4) मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्रटाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमतसमाचार, तरूण भारत, नवभारत यांनी आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं / प.उ.मा. / 197
नागपूर,दि. 19 / 01 / 2024

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषयः– फेब्रूवारी / मार्च–2024 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत.
संदर्भः–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क. / परीक्षा–7 / 260 दिनांक – 19 / 01 / 2024.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रूवारी / मार्च–2024 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्रे (**Hall Ticket**) ऑनलाईन ( **Online**) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर **College Login** मध्ये **Download** करण्याकरिता सोमवार, दिनांक 22.01.2024 पासून उपलब्ध करून देण्याबाबतचे पत्रांची प्रत जोडली आहे.

सदर पत्रास आपल्या कार्यकक्षेतील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रवेशपत्र **Download** करण्यास काही तांत्रीक अडचन उद्‌भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. **No candidate** विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र संबंधित विद्यार्थ्यांस वितरीत करण्यात येवू नये, अशी स्पष्ट सुचनेची नोंद घ्यावी.

सोबतः– राज्य मंडळ पत्राची प्रत.

KMand

( श्रीम. कल्पना लांडे )
विभागीय सचिवाँकरिता ,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपीः–

1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर सोमवार दिनांक २२/०१/२०२४ रोजी college login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी-मार्च २०२४ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२. प्रवेशपत्र (Hall Ticket) उघडताना (Open) काही त्रुटी (Error)आल्यास सदर प्रवेशपत्र Google Chrome मध्ये उघडावे.
३. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.
४. प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात जाऊन करुन घ्यावयाच्या आहेत.
५. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव या संदर्भातील दुरुस्त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरीत पाठवावयाची आहे.
६. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.
७. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : १९/०१/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.